दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र
# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
अक्षय संभाजी कामठे (संपादक पुणे आवृत्ती)




पुणे || वर्ष २ रे || अंक २०६ || मंगळवार ०९ जुलै २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## समाजाभिमुख रूग्ण सेवेचा वस्त जोपासणारे अधिष्ठाता डॉक्टर

सोलापूर : ( सैफन शेख ) सोलापूरच्या सुप्रसिद्ध डॉक्टर वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीस महाविद्यालय व श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वउपचार रुग्णालयाचे (सिव्हिल हॉस्पिटल) अधिष्ठाता डॉक्टर सुधीर देशमुख यांनी अपल्या आजपर्यंत काळात समाजाभिमुख रूग्णसेवेचा वसा जोपासल आहे. त्यांच्या कारकीर्दीत वैद्यकीय महाविद्यालयात दर्जेदार शिक्षणावर भर देण्यात आला त्यांनी महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेची समाजात प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यामुळे तत्कालीन जिल्हाधिकारी मिलींद शंभरकर यांच्या हस्ते त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला होता. डॉक्टर देशमुख यांनी ब्लड डोनेशन ड्राईव्ह अभियान राबविण्यात पुढाकार घेतला होते. तसेच देशमुख यांनी अस्थिव्यंग उपचार शास्त्र विभागात बीएमडी अभियान राबविले होते. शालेय मुले व मुलीकरता लठ्ठपणा आजारावर अभियान घेवून जनजागृती करून उपचार केले होते. तसेच महिलांच्या स्तन कर्करोगाबाबतही सिव्हिलमध्ये विशेष अभियान राबविले. एआरटी मध्ये उपचार घेणाऱ्या मातांना सकस आहार वाटप योजनेसारखा चांगला उपक्रम हाती घेतला होता. तसेच सोलापूर अर्थोपेडीक सोसायटी आणि कयूर इंटर नॅशनल इंडियाच्या वतीने ५०० बालकास प्लास्टर करून व १०५ शस्त्रकिया करून ५०० बालकांचे पाय सरळ केले त्याद्वारे सगळ बालक स्वतःच्या पायावर उभे राहू शकले. वैद्यकीय महाविद्यालयाच्या हिरक महोत्सवानिमित्त आरोग्य नगरीचे आयोजन करण्यामध्ये देशमुख यांनी महत्त्वाचे योगदान दीले. या उपक्रमास जागतिक रेकॉर्ड कम्युनिटी, यूएसने वर्ल्ड लारजेस्ट हेल्थ अ‍ॅन्ड वेलनेस फेस्टीवल




या मानाच्या पुरस्काराने महाविद्यालयास सन्मानित करण्यात आले सदर आरोग्य नगरी महोत्सवाचे कार्यकारी चेअरमनपदही देशमुख यांनी भूषविले वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्ये विभागाचे सचिव यांच्या मार्फत पीएमएसएसवाय अंतर्गत होणाऱ्या महाविद्यालय व रुग्णालय कमवारीत सोलापूर या संस्थेस बेस्ट जीएमसी पुरस्काराने गौरविण्यात आले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या सन्मान सोहळयात आषाढी व कार्तिकच्या पंढरपूर वारीत उल्लेखनिय काम केल्यामुळे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अधिष्ठाता डॉक्टर सुधीर देशमुख यांना सन्मानित करण्यात आले होते. यातच देशमुख यांचे मोठेपण दडले आहे. खऱ्या अर्थाने त्यांनी समाजहीताची रूग्णसेवा केल्याने ते कौतुकास पात्र ठरले आहेत.ङ्गङ्गङ्गरूग्ण व डॉक्टर मध्ये मैत्रीभाव निर्माण करणारे सिव्हिल अधिष्ठाता डॉक्टर संजीव ठाकूर - सोलापूरच्या डॉक्टर वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीस महाविद्यालय आणि श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वउपचार रुग्णालयाचे (सिव्हिल हॉस्पिटल) अधिष्ठाता डॉक्टर संजीव ठाकूर यांनी आपल्या कार्यकाळात रूग्ण व डॉक्टर यांच्यामधे मैत्रीभाव निर्माण केला आहे. त्यांनी आजपर्यंत समाजिक भान जोपासले आहे. कोविड-१९ मध्ये ठाकूर यांनी महत्त्वाची कामगिरी बजाविली कोवीड महिमारीच्या काळात त्यांनी फिव्हर ओपीडी कार्यान्वित केली. कोवीडग्रस्त व नॉन कोवीड महिलांची प्रसूतीसेवा कार्यरत ठेवली होती. याच काळात सर्वत्र ऑक्सीजनचा तुटवडा असताना देखील सिव्हिलमध्ये ऑक्सिजन अभावी एकही रूग्ण दगावला नाही. ३५० खाटा हया कोवीडग्रस्त रूग्णांना उपचारासाठी राखीव ठेवून त्यांना उच्च प्रतीचे उपचार केले. डायलेसीस रुग्णांसाठी कोवीड वार्डात खास डियलेसीस वार्ड सुरू केले होता. ठाकूर यांच्या पाठपुराव्यामुळे जिल्हा नियोजन समितीकडून कोवीडग्रस्त रूग्णांना उपचारासाठी आवश्यक असलेले रेमडिसीवर, टॉसिलोझमॅप इंजेक्शनचा पुरवठा करून घेतला कोवीड काळात सिव्हिलमधील रूग्णांचा मृत्यूदर इतर जिल्हयाच्या बाबतीत कमी ठेवण्यात यश प्राप्त केले होते. अत्याधुनिक दुर्बिणीद्वारे लठ्ठपणा स्थूलपणा कमी करण्याच्या शस्त्रकिया तसेच हनिया,मूळव्याध इत्यादी आजारावर शस्त्रकिया यशस्वीपणे पार पाडल्या. सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मॉडयुलार ओटी (अत्याधुनिक शल्यगृह) कार्यान्वित केले. रूग्णालयात निरामय आरोग्यासाठी स्वच्छतेवर भर दिला. रूग्णांस बाहेरून औषधे लिहून देण्याची पद्धत बंद केली. त्यामुळे रूग्ण व नातेवाईक यांचा आथिर्क तोटा कमी होवून त्यांना मानसिक स्वास्थ्य लाभले. रूग्ण व डॉक्टरांमध्ये मैत्रीचे नाते निर्माण करून रूग्ण व वरिष्ठ डॉक्टरामध्ये सुसंवादाचे वातावरण उभे केले. कोवीडची तपासणी करण्याकरीता केंद्र शासनाच्या मदतीने व्हीआरडीएल प्रयोगशाळा सुरू केली विघार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी एकलव्य योजना वैद्यकीय रूग्णालयात सुरू केली. अशी महत्त्वपूर्ण कामगिरी बजाविणारे अधिष्ठाता डॉक्टर संजीव ठाकूर हे खऱ्या अर्थाने समाजाचे देवदूतच ठरले आहेत.

## निघोजे ग्रामपंचायत उपसरपंच पदी छाया येळवंडे बिनविरोध

आळंदी ( प्रतिनिधी ) : निघोजे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी छाया बाबासाहेब येळवंडे यांची बिनविरोध निवड झाल्याचे ग्रामविकास अधिकारी व्हि. एल. गाडीलकर यांनी सांगितले. निघोजे ग्रामपंचायतीच्या माजी उपसरपंच इंदिरा फडके यांनी आपल्या पदाचा राजीनामा इतर सदस्यांना या पदावर काम करण्याची संधी मिळावी यासाठी राजीनामा दिला होता. या मुळे उपसरपंच पदाची एक जागा रिक्त होती. या उपसरपंच पदाचा राजीनामा मंजूर झाला होता. राजीनामा दिल्या नंतर रिक्त पदाच्या निवडी साठी सरपंच सुनीता येळवंडे यांच्या अध्यक्षते खाली निवडणूक प्रक्रिया घेण्यात आली. यावेळी मुदतीत अर्ज भरण्याच्या वेळेत छाया येळवंडे यांचा एकमेव अर्ज आला होता. तो अर्ज वैध ठरला. एका जागेसाठी एकच अर्ज आल्याने उपसरपंच पदी छाया येळवंडे यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा सरपंच तथा पीठासीन अधिकारी सुनिता येळवंडे यांनी केली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय आंद्रे, अजित येळवंडे, समाधान




येळवंडे, सागर येळवंडे , दिपक कांबळे, प्रियांका आल्हाट, रुपाली येळवंडे, इंदिरा फडके, मनिषा बेंडाले, स्नेहा फडके, ग्रामविकास अधिकारी व आदी मान्यवर उपस्थित होते. ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सदस्य व निघोजे गावातील ग्रामस्थ, सेवक कर्मचारी यांच्या वतीने पुष्पगुच्छ व पुष्पहार देऊन नवनिर्वाचित उपसरपंच छाया येळवंडे यांचा सत्कार करण्यात आला. निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडली.

## सोलापूर रेल्वे विभागातील कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणाचे दर्शन घडवीत आपले कर्तव्य पार

सोलापूर रेल्वे विभागातील कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणाचे दर्शन घडवीत आपले कर्तव्य पार पाडले आपल्या कर्तव्यावर कार्यरत असताना स्वतःमध्ये असणारा प्रामाणिकपणा दाखवत प्रवाश्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेतली आहे. त्यापैकी खालील घटनेतून रेल्वे कर्मचाऱ्यांनी समयसूचकता दाखवत प्रवाश्यांचा ऐवज मिळवून दिला आहे. ङ्ग

ङ्गसोलापुरातील टिकट चेकिंग स्टाफ श्री बन्नु सिंह मीना यांनी रेल्वे मध्ये विसरलेली प्रवाश्याची पर्स परत करीत प्रामाणिकपणाचे दर्शन घडवले आहे .

यातील घटना अशी कि , गाडी क्र २२१६० चेन्नई-सीएसएमटी या एक्सप्रेसमध्ये तिकीट चेकिंग दरम्यान त्यांना २ कोच मध्ये एक पॉकेट मिळाले. त्यामध्ये १०,०००/- रुपये रोख रक्कम, ड्रायविंग लायसेन्स, पॅन कार्ड, आधार कार्ड एटीएम अशी महत्वाची मूळ कागदपत्रे होती. तेव्हा संबंधित प्रवाश्याच्या आणि सीट नंबर वरून त्या प्रवाश्याचे नाव आणि पॉकेट मध्ये असणाऱ्या मूळ कागदपत्रांवरून माहिती घेत, सदरची रोख रक्कम आणि कागदपत्रे असणारी बॅग संबंधित प्रवाशाने परत केली. त्यावेळी संबंधित व्यक्तीने श्री बन्नु सिंह मीना आणि रेल्वेचे आभार मानले. श्री बन्नु सिंह मीना यांनी



आपली नोकरी करताना सोबत कर्तव्य पार पडत प्रामाणिकपणाचे दर्शन घडवले आहे .

ङ्गङ्गसोलापुरातील टिकट चेकिंग स्टाफ श्री फैझल शेख यांनी आपले कर्तव्य बजावताना प्रवाश्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेत चोराला पकडून दिले आहे. यात घडलेली घटना अशी कि, गाडी क्र. ०१४१३ निजामाबाद-पंढरपूर पॅसेंजर मध्ये लातूर स्थानकावर तिकीट चेकिंग करतेवेळी एका चोराला मोबाइल चोरी करताना पाहिले, तात्काळ त्यांनी त्याला ताब्यात घेऊन आरपीएफ च्या स्वाधीन केले. चौकशीत सदरच्या चोराकडून २ चोरीचे मोबाइल हस्तांतरित करण्यात पोलिसांना यश मिळाले. श्री फैझल शेख यांनी दाखविलेल्या समयसूचकता मुळे प्रवाशांच्या सुरक्षेची हमी मिळाली.

ङ्गसोलापुरातील टिकट चेकिंग स्टाफ श्रीमती शहनाझ शेख यांनी विसरलेली बॅग प्रवाश्याच्या हाती सुपूर्द करत प्रामाणिकपणाचे दर्शन घडवले आहे. यात घडलेली घटना अशी कि गाडी क्र. ११३०१ सीएसएमटी-बेंगळुरू जाणारी उद्यान एक्सप्रेस मध्ये कलबुर्गी स्थानकावर सदर प्रवासी आपली बॅग गाडीत विसरून गेला. त्यावेळी आपल्या कर्तव्यावर स्थित असणाऱ्या टिकट चेकिंग स्टाफ श्रीमती शहनाझ शेख यांच्या निदर्शनास ती बॅग आली. श्रीमती शहनाझ शेख यांनी आसपासच्या प्रवाश्याकडून चौकशी करीत तसेच नंबर च्या साहाय्याने सादर प्रवाशांची माहिती काढून त्यांना संपर्क साधला आणि कलबुर्गी स्थानकावर त्या प्रवाश्याला बोलावून घेत बॅगेची ओळख पटवून ती बॅग सुखरूप त्याच्या स्वाधीन केली.

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक श्री.योगेश पाटील यांच्याकडून या सर्व कर्तव्यनिष्ठ कर्मचाऱ्यांचे कौतुक करण्यात आले.

## पंढरीचा विठुराया भाविकांच्या दर्शनासाठी २४ तास उभा; व्हीआयपी, ऑनलाईन दर्शन बंद

पंढरपूर: सावळ्या विठुरायाच्या आषाढी यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांसाठी आता २४ तास उभा राहणार आहे. दि ७ जुलै ते २६ जुलैपर्यंत या कालावधीत देवाचे दर्शन २४ तास राहणार आहे. देवाचा विश्रांतीचा चांदीचा पलंग विधिवत पूजा करून काढण्यात आला. त्यानंतर विठ्ठलाच्या मागे आणि रुक्मिणी मातेच्या पाठीला मऊ कापसाचा लोड लावण्यात आला असल्याची माहिती श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहा अध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली . दरम्यान, आषाढी एकादशी १७ जुलै रोजी आहे.वारकरी संप्रदायाला शेकडो वर्षांची परंपरा आहे. या परंपरेनुसार आषाढी आणि कार्तिकी वारीच्या दरम्यान भाविकांना दर्शन सुलभ व्हावे म्हणून देव २४ तास उभा असतो. या कालवधीत देवाच्या शेजघरातील विश्रांतीचा पलंग काढला जातो. हा पलंग काढण्याआधी विधिवत पूजा केली जाते. त्यानंतर देवाच्या शेजघरातील पलंग बाहेर



काढण्यात आला. यावेळी या चांदीच्या पलंगावरील देवाच्या गाद्या गिरद्या देखील बाहेर काढून ठेवण्यात आल्या. देवाचे शेजघर मोकळे करून ठेवण्यात आले . आजपासून देवाचे सर्व राजोपचार बंद करून देव फक्त भाविकांच्या दर्शनासाठी सज्ज झाला आहे . विठ्ठलाच्या व रुक्मिणीमातेच्या पाठी मऊ कापसाचा लोड ठेवण्यात आला आहे. जेणेकरून देवाला शीणवठा येणार नाही अशी भावना वारकरी संप्रदायाची आहे. देवाचे दर्शन २४ तास खुले केल्याने आता रोज पायावर ५० हजार तर मुखदर्शनातून ५० ते ६० हजार भाविकांना दर्शन मिळू शकणार आहे. असे असतील विठुरायाचे नित्यक्रम पहाटे साडेचार वाजता देवाचे स्नान आणि नित्यपूजा करण्यात येईल. या काळात फक्त १ तास दर्शन बंद असेल. यानंतर दुपारी महानैवेद्याला १५ मिनिटे आणि रात्री नऊ वाजता लिंबू पाणी देण्यासाठी १५ मिनिटे दर्शन थांबविण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली आहे. याशिवाय संपूर्ण दिवस रात्र विठुराया आपल्या लाडक्या भक्तांना दर्शन देत उभा असणार आहे.

संपादकीय

## झाडे लावा, जीवन वाचवा

हिरव्यागार झाडांमुळे जणू सृष्टीने हिरवा शालू नेसला असे आपणा सर्वांना वाटत असते. तेव्हा कोकणात आल्यावर असे शालू पाहायला मिळतात. त्यामुळे मनाचे खूप समाधान होते. कारण आपण निसर्गाच्या सान्निध्यात आल्याची आपल्याला जाणीव होते. मात्र आजची परिस्थिती वेगळी आहे. विकासाच्या नावाखाली वृक्षतोड होते. त्या प्रमाणात वृक्षारोपण होत नाही. त्यामुळे आज 'झाडे लावा, जीवन वाचवा' असे म्हणण्याची वेळ आली आहे. तसेच 'मन की बात' या कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुद्धा देशातील जनतेला आवाहन केले की, आपल्या आईच्या नावाने एक झाड लावावे याची पण सर्वांना माहिती आहे.

देशात विकासाच्या नावाखाली झाडे तोडली जातात. मात्र त्या प्रमाणात झाडांची लागवड केली जात नाही. तेव्हा निसर्गाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक वर्षी पावसाळ्यात झाडे लावण्यासाठी जनजागृती करून झाडे लावली पाहिजेत. त्याचप्रमाणे झाडांचे संगोपन केले पाहिजे तरच आपले जीवन वाचवू शकतो. तेव्हा आजच्या घडीला झाडे लावणे गरजेचे झाले आहे. एक वेळ आपल्या परिसरातील डोंगर झाडांच्या हिरव्यागार पानांनी सजलेले दिसत होते. आज त्या ठिकाणी सिमेंटची जंगले उभी असताना दिसतात. याचा परिणाम दिवसेंदिवस जंगलतोड होत असल्यामुळे पावसाचे प्रमाण कमी होऊ लागले आहे. तेव्हा सुजाण नागरिकांनी उंच इमारतीत राहाणे पसंत जरी केले तरी किमान एक व्यक्ती एक झाड दर वर्षी लावणे स्वत:च्या तसेच देशाच्या हितासाठी गरजेचे आहे. म्हणजे दर वर्षी देशात १०० कोटीपेक्षा जास्त झाडे लावू शकतो. हा महत्त्वाचा संकल्प सन २०२४ पासून आपल्या देशातील प्रत्येक नागरिकांनी केला पाहिजे. केवळ 'झाडे लावा झाडे जगवा' अशी घोषणा करून चालणार नाही तर प्रत्यक्षपणे कृती करणे गरजेचे आहे. जेव्हा शासकीय अनुदानातून वृक्षारोपण करीत असतो तेव्हा अनुदान फुकट जाणार नाही याची काळजी वनविभागाला घ्यावी लागेल. त्यासाठी प्रथम जमिनीचे क्षेत्र निवडावे लागेल. उन्हाळ्यात दोन ते तीन वर्षे झाडांना पाणी घालण्यासाठी जवळपास नदी-नाले असणे आवश्यक आहे. वाडीत व गावातील मोकळ्या जागेत तसेच रस्त्यांच्या दोन्ही बाजूला झाडांची लागवड करण्यात यावी तसे अगोदर मोकळ्या जागेचे सर्वेक्षण शासनाच्या वतीने करण्यात यावे. म्हणजे पावसाळ्यात झाडे लावणे सोयीचे होईल.

सध्या पावसाळा सुरू झाला असला तरी कडक उन्हाळ्यामध्ये प्रत्येकाला झाडांची आठवण आली असेल. तेव्हा गाजावाजा न करता किमान 'एक व्यक्ती, एक झाड' या तत्त्वाचा अवलंब करून या वर्षीपासून झाडे लावूया. त्यासाठी देशातील प्रत्येक व्यक्तीने डोळ्यांसमोर ध्येय्य ठेवूया. यातच आपले सर्वांचे कल्याण आहे.

दरवर्षी झाडे लावा, झाडे जगवाचा नारा देतो. मात्र यातील किती झाडे जगवतो याचा प्रामाणिकपणे विचार होणे आवश्यक आहे. पाहा ना देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात राज्यात ३३ कोटी झाडे लावण्याचा निर्धार केला होता. त्यासाठी रुपये एक हजार कोटी खर्च करण्यात आले. याची सुरुवात १ जुलै, २०१९ रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील आनंदवनमध्ये वनमहोत्सव साजरा करून १ जुलै, २०१९ ते ३० सप्टेंबर, २०१९ या तीन महिन्यांत झाडे लावण्याचा संकल्प करण्यात आला होता. त्यावेळी 'एकच लक्ष, लावू ३३ कोटी वृक्ष' अशा गर्जना सुद्धा झाल्या. आता यातील किती झाडे जगली आहेत याचा वनमहोत्सव साजरा करणाऱ्या वनविभागाने घोषित करणे आवश्यक आहे. कारण ही झाडे लावण्यासाठी राज्यातील प्रत्येक नागरिकाचा आर्थिक सहभाग आहे. याची जाणीव राज्यातील प्रत्येक नागरिकांना झाली पाहिजे.

तरच शासकीय अनुदानाचा योग्य प्रकारे वापर होईल.राज्यात औद्योगिकीकरणाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल करण्यात येत आहे. मात्र त्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात येत नाही. झाडे लावली जातात ती सुद्धा कार्यक्रमापुरते त्यामुळे उन्हाळ्यात उष्णतेचा पारा चढू लागला आहे. अंगाची लाहीलाही होत आहे. याचा पण विचार देशातील नागरिकांनी करणे गरजेचे आहे. देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून औद्योगिक बदल घडणे गरजेचे असते. याचा अर्थ असा नव्हे की, झाडांचा नायनाट करणे. तेव्हा दरवर्षी प्रत्येकांनी न विसरता आपल्या परिसरात पावसाळ्यात झाड लावलेच पाहिजे असा संकल्प करुया.

# पावसाच्या सुरवातीला घोडबंदर रस्ता झाला खड्डेमय : प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे ठाणेकर भोगतायं वाहतूक कोंडीची समस्या

ठाणे,(प्रतिनिधी) :

घोडबंदरचा रस्ता आणि खड्डे हे नेहमीचे समीकराण् बनले आहे. अनेक अपघात होत असतानाही आणि याच जिल्ह्याचे मुख्यमंत्री असतानाही अद्यापही घोडबंदर रस्त्याचा दर्जा सुधारण्यात प्रशासन सपशेल अयशस्वी ठरल्याचे घोडबंदर रस्त्यावरून स्पष्ट होत आहे. ठाण्यातील घोडबंदर रस्ता हा राज्य महामार्ग असून हा सार्वजनिक बांधकाम विभाग ,एमएमआरडीए, मेट्रो प्रकल्प तसेच ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून देखभाल केली जाते. यामध्ये सेवा रस्ता ठाणे महानगरपालिकेच्या अखत्यारित येतो. केवळ प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे दरवर्षी घोडबंदर रस्त्यावरील दुरावस्थेमुळे ठाणेकरांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असून घोडबंदरवर पडलेल्या मोठ-मोठ्या खड्ड्यामुळेच पावसाळ्यात नाहक बळी जाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढण्यास प्रशासन



कारणीभूत असल्याचा आरोप मनसेचे स्वप्नील महिंद्रकर यांनी केला आहे.

घोडबंदर रस्ता हा राज्य महामार्ग असल्यामुळे या रस्त्यावर नेहमीच मोठ्या प्रमाणावर वाहतूकीची वर्दळ असते. याचबरोबर पनवेल जेएनपीटी, नाशिक ,अहमदाबाद, राजस्थान येथे जाणाऱ्या अवजड वाहने देखील येथून मोठ्या प्रमाणावर याच महामार्गावरून ये जा करत असल्याने येथील रस्ता सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी सर्व प्राधिकारणाची असून देखील प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे ठाणेकरांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे या मार्गावरील अपघाताचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत चालले आहे. घोडबंदर रोड हा दरवर्षी खड्डेमय होत असल्याचे प्रमुख कारण संबंधित प्राधिकरणामध्ये समन्वय नसल्याचे दिसून येत आहे. याप्रश्नी संबंधित

प्राधीकरणाना वारंवार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या स्वप्नील महिंद्रकर यांनी तक्रार करून सुद्धा यावर प्रशासन कारवाई करत नसल्याचे दिसून येत आहे.

सध्याच्या घडीला सेवा रस्त्यावर जागोजागी एमएमआरडीए प्राधिकरणाच्या वतीने खोद काम करण्यात आले आहे व पावसाळ्यात मुख्य राज्य महामार्ग वाहतूक कोंडीमध्ये अडकला असल्यास सेवा रस्त्याच्या माध्यमातून वाहतूक सुरळीत करण्याचे काम पोलिसांमार्फत केले जात होते, पण त्याला सुद्धा या पावसाळ्यात एमएमआरडीएच्या नियोजन शून्य कारभारामुळे ब्रेक लागला आहे. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी घोडबंदर रस्त्यावर संबंधित सर्व प्राधिकरणाने रस्त्याची काम व्यवस्थितरित्या करून घेणे अपेक्षित असते. पण वर्षानुवर्षे ही कामे व्यवस्थित व योग्यरित्या होत नसल्यामुळे रस्ता पावसाळ्यात खड्डेमय झाला आहे. तर या मार्गावरील एमएमआरडीए, एमएसआरडीसीच्या वतीने सांभाळण्यात येणाऱ्या बहुतेक पूलांवर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे वाहतूक संतगती होत असून अपघाताच्या घटना दररोज समोर येत आहेत.

----------------

*प्रतिक्रिया*

***घोडबंदर रस्ता हा राज्य महामार्ग असून याचे देखभाल व दुरुस्ती करण्याचे काम एका प्राधिकरणाच्या माध्यमातून झाले पाहिजे. मुंबई उच्च न्यायालयाच्या वतीने या संबंधित क्षेत्रात येणारे रस्ते महानगरपालिकेला हस्तांतरण करून त्यांनी ते सांभाळणे असे सूचित करण्यात आले आहे. मात्र तरीही ही कामे केली जात नसल्याचे समोर येत असून याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दखल घेण्याची आवश्यकता आहे.***

***स्वप्नील महिंद्रकर, ठाणे शहर अध्यक्ष जनहित व विधी विभाग मनसे***

# महाराष्ट्र पॉलिटेक्नीकची उज्ज्वल यशाची परंपरा कायम..!

मंडणगड :- येथील दळवी एज्युकेशनल अँड चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र पॉलिटेक्निक शेनाळेचा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने घेतलेल्या उन्हाळी परीक्षा २०२४ चा निकाल घोषित झाला असून महाविदयालयाच्या विदयार्थ्यांनी उज्ज्वल यशाची परपंरा कायम ठेवत महाविदयालयातुन तल्हा इमाद पल्लवकर याने ८२.४४ टक्के घेवुन प्रथम येण्याचा मान मिळवला. महाविदयालयातील १०५ विदयार्थी हे विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेले आहेत.उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखल्याचे समाधान संस्थेचे चेअरमन अजय दळवी यांनी व्यक्त केले. ङ्ग मंडणगड शहरापासून ६ किमी अंतरावर असलेल्या शेनाळे या ठिकाणी असलेले महाराष्ट्र पॉलिटेक्निक महाविद्यालय ज्ञानदानाचे कार्य गेली अनेक वर्षे नेटाने करत आहेत.

महाविदयालयातील (कॉम्प्युटर) संगणक आभियांत्रिकी शाखेतील प्रथम वर्षातील सबरिन खान ७६.४२ टक्के घेऊन प्रथम, सागर साळवी ७२ टक्के घेऊन द्वितीय, ओम दळवी ७० टक्के घेऊन तृत्तीय येण्याचा मान मिळवला आहे. तसेच




मेकॅनिकल शाखेतील प्रसाद पवार ७२.०० टक्के घेऊन प्रथम, सुरज गोलांबडे ६५.८९ टक्के घेऊन द्वितीय, रशवीण बेर्डे याने ६५.२२ टक्के घेऊन तृत्तीय येण्याचा मान मिळवला आहे. प्रथम वर्षातील सिव्हिल शाखेतील सुजल जाधव ६७. ११ टक्के घेऊन प्रथम, गोपीचंद जाधव ६५.३३ टक्के घेऊन द्वितीय, अतुल कोरपे आणि अभिषेक कनक हे दोघांनी ६५.२२ टक्के घेऊन तृत्तीय येण्याचा मान मिळवला आहे. प्रथम वर्षातील केमिकल शाखेतील सार्थक यादव ६६.५९ टक्के घेऊन प्रथम, अमित माटे ६४.३५ टक्के घेऊन द्वितीय, श्रावण सुतार याने ६२.२४ टक्के घेऊन तृत्तीय येण्याचा मान मिळवला आहे. प्रथम वर्षातील इलेक्ट्रीकल शाखेतील प्रतीक धाडवे ७४.२४ टक्के घेऊन प्रथम, शर्मिला चिनकटे ७१.०६ टक्के घेऊन द्वितीय, मारुफ चेलकर याने ६७.८८ टक्के घेऊन तृत्तीय येण्याचा मान मिळवला आहे. ङ्गङ्गङ्ग(कॉम्प्युटर) संगणक आभियांत्रिकी शाखेतील द्वितीय वर्षातील स्वप्नील कांबळे ७५ टक्के प्रथम, योगेश चिले ६७.७३ टक्के द्वितीय येण्याचा मान मिळवला आहे. द्वितीय वर्षातील इलेक्ट्रीकल शाखेतील ऋतुजा शिंदे ७५.८७ प्रथम, शुभम महाडिक ७५.०७ टक्के द्वितीय व प्रथमेश तरडे ७५ टक्के घेऊन तृत्तीय येण्याचा मान मिळवला आहे. द्वितीय वर्षातील केमिकल शाखेतील सुरज साळवी ६७.६३ टक्के प्रथम, मानसिंग महाडिक ६०.२५ टक्के द्वितीय व श्रीकांत पार्टे ६०.५ टक्के घेऊन तृत्तीय येण्याचा मान मिळवला आहे. द्वितीय वर्षातील मेकॅनिकल शाखेतील विशाल काप ७७.३८टक्के प्रथम, राज जाधव ७३.८८ टक्के द्वितीय व उमेश दिवकर ७३. १३ टक्के घेऊन तृत्तीय येण्याचा मान मिळवला आहे. द्वितीय वर्षातील सिविल शाखेतील अरफत मुकादम ७६.३ प्रथम, मोहम्मद सैन ७१. ६३ टक्के द्वितीय व सुयोग कोरपे ६९.७५ टक्के घेऊन तृत्तीय येण्याचा मान मिळवला आहे. ङ्गङ्गमहाविदयालयातील तृत्तीय वर्षातील सिविल अभियांत्रिकी शाखेतील विकास गुरव हा ७३.६७ टक्के घेऊन प्रथम, ओनकार नारकर ७३.६७ टक्के घेऊन द्वितीय सेजल राठोड ७३.११ टक्के घेऊन तृत्तीय येण्याचा मान मिळवला आहे. महाविदयालयातील तृत्तीय वर्षातील केमिकल अभियांत्रिकी शाखेतील चेतन खराडे हा ६४.२८ टक्के घेऊन प्रथम, ऋतुजा कांबळे ६४.०६ टक्के घेऊन द्वितीय अमर राणे आणि विजय देशमुख यांनी ६३.०६ टक्के घेऊन तृत्तीय येण्याचा मान मिळवला आहे. तृत्तीय वर्षातील मेकॅनिकल शाखेतील तल्हा इमाद पल्लवकर ८२.४४ टक्के घेऊन प्रथम, रविकिरण जंगम ७६.४४ टक्के घेऊन द्वितीय आणि सुयश बुटाला यांनी ७५.११ टक्के घेऊन तृत्तीय येण्याचा मान मिळवला आहे. तृत्तीय वर्षातील इलेक्ट्रीकल शाखेतील मेहबूब मुनझर ७३.३९ टक्के घेऊन प्रथम, अरिफ लुकमन ७०.०६ टक्के घेऊन द्वितीय आणि शुभम दाभेकर यांनी ६७.११ टक्के घेऊन तृत्तीय येण्याचा मान मिळवला आहे.ङ्गङ्गसंस्थेचे रजिस्ट्रर विशाल नटे यांनी ज्ञानदानाचे कार्य असेच कायम ठेवून विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्धतीवर भर असल्याचे सांगितले. यावेळी उज्ज्वल निकालाचे श्रेय अनुभवी प्राध्यापक वर्ग, पालक वृंद यांना जाते तसेच या सर्व वातावरणात आपले १००% प्रयत्न देणारे विद्यार्थी या सर्वाच्या एकत्रित प्रयत्नानेच हे यश प्राप्त प्राचार्य अरुण ढंग यांनी सांगितले. ङ्गङ्गसर्व यशस्वी विदयार्थ्यांचे महाविदयालयाच्या वतीने संस्थचे अध्यक्ष श्री.अशोक दळवी,संचालक अजय दळवी, प्राचार्य अरुण ढंग, उप-प्राचार्य शीतल मोहिते शिक्षक व शिक्षेकत्तर सर्व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले..

# आरक्षण मर्यादा वाढविण्यासाठीचा विधिमंडळाचा ठराव केंद्राकडे पाठवा

आरक्षणप्रश्नी सर्वमान्य तोडगा काढण्यासाठी आंदोलनकर्ते मनोज जरांगे आणि प्रा. लक्ष्मण हाके यांचे म्हणणे सरकारने ऐकून घ्यावे. नुसती सर्व पक्षीय बैठक घेऊन काही होणार नाही.

आवश्यकता वाटल्यास विधिमंडळात उर्वरित दोन दिवसांच्या कामकाजात आरक्षण मर्यादा वाढविण्यासाठी ठराव घ्यावा. तो केंद्र सरकारकडे पाठवावा. केंद्रामध्येही न्याय हक्काच्या मागणीसाठी शिवसेना पाठिंबा देईल, असे शिवसेनेचे नेते उद्धव ठाकरे यांनी रविवारी सांगितले.

संभाजीनगर येथे 'शिवसंकल्प मेळाव्यात' ते बोलत होते.आरक्षण प्रश्नावरून आता जिवांशी खेळू नका, प्रश्न निकाली लागावा यासाठी काम करा. केवळ दुही माजवून न्याय हक्क मिळत नसेल तर एकत्र येऊन महाराष्ट्राची ताकद दिल्लीश्वरांना दाखवा, असे म्हणत मराठा-ओबीसीमध्ये दुहीचे बीज रोवून राजकारण करू पाहणाऱ्यांना राजकीय अर्थाने संपवा, असेही ठाकरे म्हणाले. आरक्षण प्रश्नावर जातीजातींमध्ये भांडणे लावून जर भाजप मजा बघणार असेल तर तसे होऊ दिले जाणार नाही. मराठा, धनगर आणि ओबीसीच्या न्याय्य मागण्यांसाठी शिवसेना पाठीशी असेल असेही ठाकरे यांनी सांगितले.आतापर्यंतच्या सर्व पक्षीय बैठकीतून फारसे काही हाती लागले नाही. त्यामुळे आम्हाला कोणाला विचारण्यापेक्षा जे नेतृत्व करत आहेत त्या मनोज जरांगे आणि हाके यांनाच बोलावून घेऊन मार्ग काढण्यासाठी बोलावे लागणार आहे.

असे करताना आरक्षण मर्यादा वाढविण्याचा प्रस्ताव विधिमंडळात आल्यास शिवसेना त्यास पाठिंबा देईल, असेही ठाकरे म्हणाले. केवळ राज्यातच नाही तर केंद्र सरकारमध्येही शिवसेनेची तीच भूमिका असेल, असे ठाकरे म्हणाले.

लाडकी बहीण योजना पापे झाकण्यासाठी राज्य सरकारने सुरू केलेली लाडकी बहीण योजना ही पापे झाकण्यासाठी योजनांचा सुकाळ असे म्हणावे लागेल. आता या योजनेच्या अर्जासाठी गर्दी होते आहे. पण घरात शिकलेली तरुण मुले व मुली बेरोजगार आहेत त्यांच्यासाठीही एखादी लाडके भाचे योजना सुरू करावी सरकारने. असल्या योजनांचा सुकाळ म्हणजे राजकीय मूर्खपणाच असेही ठाकरे म्हणाले.

# नीट रद्द केल्यास प्रामाणिक उमेदवारांच्या हिताला धोका : केंद्र सरकारची सुप्रीम कोर्टात भूमिका

नवी दिल्ली: नीट-यूजी २०२४ परीक्षा पूर्णपणे रद्द केल्यास लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या हिताला धोका होईल. तसेच, गोपनीयतेचा भंग केल्याचा कोणताही पुरावा नसताना असा निर्णय घेणे तर्कसंगत ठरणार नाही, असे मत शिक्षण मंत्रालयाच्या संचालकांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात व्यक्त केले आहे एमबीबीएस, बीडीएस, आयुष आणि इतर संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) ५ मे रोजी आयोजित केलेली राष्ट्रीय पात्रता-प्रवेश परीक्षा-अंडर ग्रॅज्युएट (नीट-यूजी) परीक्षा



प्रश्नपत्रिका फुटल्याच्या आरोपांमुळे वादात सापडली. या मुद्यावरुन न्यायालयात अनेक याचिका दाखल झाल्या आहेत

नीट-पीजी परीक्षा ११ ऑगस्ट रोजी

यंदाची नीट-पीजी परीक्षा येत्या ११ ऑगस्ट रोजी दोन शिफ्टमध्ये होणार आहे. पात्रतेसाठी १५ ऑगस्ट ही कट ऑफ डेट निश्चित करण्यात आली आहे. ही घोषणा नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन ऑफ मेडिकल सायन्सेसने केली

------------

दिल्लीच्या गंगाधरला लातुरात आणणार लातूर: नीट परीक्षेमध्ये गुणवाढीच आमिष दाखवून फसवणूक करणारे दोघे सीबीआय कोठडीत आहेत. अटकेतील आरोपींच्या कोठडीची मुदत शनिवारी संपत आहे. या प्रकरणात दिल्लीच्या गंगाधरलाही लातुरात आणले जाणार असल्याची माहिती आहे

# विरोधी पक्षनेते राहुल गांधींचा असाम अन् मणिपूर दौरा

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज(दि.८) असाम () आणि मणिपूरचा दौरा केला. त्यांच्या या या दौऱ्याची सुरुवात सिलचर येथून केली.

येथे त्यांनी पूरग्रस्तांची भेट घेतली अन् थलाई येथील मदत शिबिरांची पाहणी केली. आसाम दौऱ्यावर असताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष भूपेन बोरा यांनी राहुल गांधींना निवेदन सादर करुन आसाममधील बारमाही पुराचा मुद्दा संसदेत मांडण्याची विनंती केली.असामचा दौरा झाल्यानंतर राहुल गांधींनी मणिपूर येथील जिरीबाम उच्च माध्यमिक विद्यालयातील मदत शिबिराला भेट दिली.



यानंतर त्यांनी इंफाळच्या मदत छावण्यांमध्येही पाहणी केली. आता सायंकाळी ते मणिपूरच्या राज्यपालांची भेट घेणार आहेत. याशिवाय पक्षाच्या नेत्यांनाही भेटणार असून, लोकसभा निवडणुकीत जनतेने दिलेल्या पाठिंब्याबद्दल आभार मानणार आहेत. लोकसभा निवडणुकीत मणिपूरच्या दोन्ही जागा काँग्रेसने जिंकल्या आहेत.

राहुल गांधींच्या दौऱ्यापूर्वी या भागात गोळीबार

राहुल गांधी यांचा हा तिसरा मणिपूरचा दौरा आहे, तर विरोदी पक्षनेते झाल्यानंतरचा पहिला आहे. दरम्यान, राहुल गांधी मणिपूरला पोहोचण्यापूर्वी आज पहाटे ३.३० वाजता जिरीबाममध्ये जोरदार गोळीबार झाला. सुमारे ३.३० तास हा गोळीबार सुरू होता. प्रत्युत्तरादाखल सुरक्षा दलांनीही गोळीबार केला. या घटनेनंतर आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात सुरक्षा दल तैनात करण्यात आले आहे.आसाममध्ये पूर आणि पावसामुळे आतापर्यंत ७८ जणांचा मृत्यूदरम्यान, आसाममध्ये पुरामुळे परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली आहे. २९ जिल्ह्यांमध्ये एकूण २३ लाख लोकांना पुराचा फटका बसला आहे. निमतीघाट, तेजपूर, गोलपारा आणि धुबरी येथे ब्रह्मपुत्रा नदी धोक्याच्या चिन्हावरून वाहत आहे. त्याच्या उपनद्याही अनेक ठिकाणी धोक्याच्या पातळीवर वाहत आहेत. पुरामुळे हजारो हेक्टरवरील पिके पाण्याखाली गेली आहेत.

# आषाढसरी

तो काळा मेघ बघून सुचलेलं मेघदूत आणि आमचा काळा विठोबा याच्यासाठी विरह प्रेम आणि भक्तिभावनेने व्याकुळ झालेला वारकरी आणि आषाढ महिना, आषाढीवारी या आनुषंगाने

प्रा. मीरा कुलकर्णी क. जे सोमय्या कला आणि वाणिज्य महाविद्यालय, घाटकोपर मुंबई

हत्तीच्या आकाराचा काळ्या रंगाचा पाण्याने भरलेला मेघ बघून कवी कालिदासांना मेघदूत हे नितांत सुंदर काव्य सुचले आणि कटेवर हात ठेवून युगानुयुग समचरण उभा असलेला साक्षात भुवैकुंठीचा सावळा परब्रह्म असा गोजिरा काळा विठोबा आणि त्याच्या भेटीसाठी विराहने व्याकुळ झालेला प्रेमासह भक्तीत चिंब भिजलेला आमचा वारकरी जेव्हा संत ज्ञानदेव, निवृत्तीनाथ, तुकोबाराय, जनाई, सावतामाळी, कान्होपात्रा अशा अनेक संतांच्या ओव्या, अभंग, भारूड गात वारीत तल्लीन होतात तेव्हा त्या संत साहित्यातल्या शब्दवैभवाची भाषा आणि भावनांचे सौंदर्य अनुभवत त्यातील रस, भाव, अलंकाराच्या गजरात तल्लीन होऊन जेव्हा आषाढी एकादशीचे निमित्त सादर दिंडीत सहभागी होतात तेव्हाही या वारकऱ्यांना चिंब न्हाऊ घालतात या आषाढसरी! ताटातूट विरह हा मेघदूत या काव्याचा पाया आहे. तर माऊलीच्या भेटीसाठी 'भेटी लागी जीवा लागलीसे आस' असा विरहव्याकुळ असलेला आमचा वारकरी आहे. आषाढ सरी आणि आषाढ महिना अनुभवताना या सगळ्या भावना मनाला नेहमीच आनंद देतात.

आश्लेषांच्या तुषार स्नानी
भिऊन पिसोळी थव्याथव्यांनी
रत्नकळा उधळीत माध्यान्ही
न्हाणोत इंद्रवर्णात वना
अरे थांब जरा आषाढ घना
बघूं दे दिठी भरून तुझी करुणा

निसर्गसौंदर्याने ओथंबलेल्या, हिरवाईच्या अनेक छटांनी चहूबाजूने निसर्गाला वेढलेल्या, रंगीबेरंगी जादुई किमयेची बहार घेऊन येणारा आषाढघन! वर्गात बोरकरांची 'रे थांब जरा आषाढ घना' कविता या आषाढ महिन्याचे औचित्य साधून शिकवत होते. मुलांचे डोळे कुतूहलाने उत्सुक झालेले. बाहेर अधूनमधून उघडणारा पाऊस आणि आषाढाचे वर्णन करताना मुलांसमोर आपोआप उलगडत गेलेला आषाढ महिना मग ओघानेच आलेला आषाढातला प्रथम दिवस आणि या आषाढातल्या पहिल्या दिवसाशी घट्ट नातं जोडला गेलेला कवी श्रेष्ठ कालिदास आणि त्यांचे अजरामर महाकाव्य मेघदूत!

या आषाढ वेगाने साहित्यातल्या अशा अनेक लेखक कवींना भुरळ घातलेली आपल्या शांताबाई, बोरकरांपासून ते रवींद्रनाथ टागोरांपर्यंतच्या अनेक लेखक, कवींनी मुक्तपणाने आषाढावर, मेघदूतावर लिहिले. त्यांची प्रतिभा, शब्दवैभव भरभरून ओसंडून वाहिले. लिहिताना असा हा आषाढातला प्रथम दिवस

रणरणत्या उन्हात, नांगरून झालेल्यार शेतात मृगाचा पाऊस पडतो आणि ओल्या जमिनीत बी पेरून इथला बळीराजा वाट बघतो आषाढाची. अधूनमधून येणाऱ्या आषाढसरींनी ग्रीष्मात तापलेली जमीन प्रफुल्लित होते आणि सगळी सृष्टी उल्हसित होते. ही किमया आषाढसरींची. आषाढ मेघांनी लालसर माती भिजवून हिरवीगार शेतं उगवलेली दिसतात. सगळीकडे सोनचाफा, केवडा फुलतो आणि लाजरी जाई-जुई बहराला येते. या निसर्गसौंदर्याची मनसोक्त उधळण आषाढातच व्हावी हे किती नितांत सुंदर आहे ना! या निसर्गसौंदर्याची भूल पक्ष्यांनाही पडावी आणि मग पक्ष्यांचे, फुलपाखरांचे थवेच्या थवे त्या फुलांशी, हिरव्यागार निसर्गाशी आणि आषाढसरींशी संवाद साधत आकाशात स्वैर विहारावेत. या नयनरम्य सुखद नजराण्याची बरसात आषाढातच मुक्तपणे अनुभवता येते.

'आषाढस्य प्रथम दिवसे' हा कवी कुलगुरू महाकवी कालिदास दिन म्हणून ओळखला जातो. निसर्गाच्या या विविध घटकांमधून डोकावणारा मानवी म्हणून कालिदासाच्या प्रतिभेतून मेघदूताच्या रूपाने साकारले आणि विरहाने व्याकुळ यक्षच मेघाला म्हणजे आषाढसरींना आपला दूत होण्याची विनंती करतो आणि आपल्या प्रेयसीला त्याच्याकरवी निरोप पाठवतो. ही मेघादूताची मध्यवर्ती कल्पना. हा यक्ष मेघाला आपल्या प्रेयसीपर्यंत पोहोचण्यासाठीचा जो मार्ग सांगतो त्या मार्गाचे वर्णन वाचताना आषाढातल्या पावसामुळे इथे जमिनीवर निर्माण झालेले नितांत सुंदर भौगोलिक सौदर्य, खळाळून वाहणाऱ्या नद्या, सृष्टीने आपल्या सौंदर्याची मुक्त उधळण केली आहे. याचे केलेले वर्णन अभ्यासकांसह रसिक मनालाही भुरळ घालणार आहे. कदम व वृक्ष असो, विदिशा नगरी असो किंवा नर्मदा वेत्रवदी नदी आणि वाटेतल्या निसर्गाची अप्रतिम वर्णन, निसर्गाचे नितांत सौंदर्यच अधोरेखित करते.

विरह, प्रेम या भावनांनी ओतप्रोत भरलेले मेघदूत हे महाकाव्य असो किंवा हजारो मैल टाळमृदंगाच्या गजरात हरिनामाचा गजर करत, भक्तीभावनेने चालणारा आणि विठुरायाच्या दर्शनासाठी वीरहाने व्याकुळ झालेला आमचा वारकरी असो. पंढरीच्या दिशेने याचि देही याचि डोळा सावळ्या परब्रह्माचे रूप पाहण्यासाठी आषाढी एकादशीच्या निमित्ताने त्याने आषाढातल्या निसर्गवैभवाचा आनंद घेत मनातल्या प्रेम, विरह,भक्ती भावनेच्या अंगाने जाणाऱ्या अभंग गवळणी भारूड घाट विठुरायाच्या दिशेने झेपावणे काय!मेघ तुझा त्या भावना आणि वारकऱ्यांच्या भावना आषाढ महिना असो आपल्या आषाढसरींनी प्रफुल्लित करतो. धर्म-जात-पंथ ओलांडून या मेघदूतांनी अनेक भाषांमध्ये स्वैरविहार केलाच. पण रसिक मनाला भुरळ पाडली! सावळ्या परब्रह्मांच्या ओढीने अवघी संतांची, भक्तांची मांदियाळी त्या चंद्रभागेच्या वाळवंटात गोळा होऊन आध्यात्मिक लोकशाही निर्माण होण्यासाठी या अषाढ महिन्याचेच औचित्य साधावे हा केवढा निसर्ग वैभवचा मोठेपणा सांगणारा योगायोग!

आपल्या हिंदू पंचांगानुसार आषाढ महिन्यात पौर्णिमेला चंद्र पूर्वाषाढ नक्षत्राच्या आसपास असतो. म्हणून हा आषाढ महिना काही ठिकाणी याला आखाडही म्हणतात. या आषाढ महिन्यात हवेत गारवा पसरवणाऱ्या सरी घरच्या गृहिणीलाही आषाढ तळण तळायला भाग पडतात. सुगरण स्त्रियांच्या पाककलांना आषाढ महिन्यात परंपरेने अनेक पाककृतींनाही असे स्थान दिले.

# रिलायन्स एन.एम.डी एम्प्लॉईज को.आप.क्रेडीट सोसायटी संचालक मंडळाच्या निवडणुकीत विजयी उमेदवारांचा बेणसेत जल्लोष, अधिकारी , कामगार वर्गातून अभिनंदनाचा वर्षाव

पाली /बेणसे दि . (धम्मशील सावंत)

रिलायन्स एन.एम.डी एम्प्लॉईज को.आप.क्रेडीट सोसायटी संचालक मंडळाच्या निवडणुकीत विजयी उमेदवारांनी नागोठणे टाऊन शिप वसाहत आणि बेणसे येथे जल्लोष केला. या विजयानंतर सर्व विजयी उमेदवारांचे कामगार वर्गातून अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. एम्प्लॉईज को.आप.क्रेडीट सोसायटी संचालक मंडळाच्या निवडणुकीत विजयी उमेदवारांमध्ये १) श्री के. टी शिर्के २) श्री गणपत पाटील,३) श्री वैभव जवके , ४) श्री राजेंद्र कुमार दलाल ५) श्री दत्तात्रय शेळके ,६) श्री अशोक भोय , ७) श्री राजा लवटे आदींचा समावेश आहे. कामगार वर्गाच्या हितासाठी, न्याय हक्कासाठी कायम कार्यरत असणाऱ्या विजयी उमेदवारांनी यापुढेही कामगारांचे हित जोपासण्याची भूमिका बजावावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.



सर्व विजयी उमेदवारांचे कामगार नेते साधुराम मालुसरे, कामगार नेते दीपक भाई रानवडे, कामगार नेते श्री चवरकर, उदय दिवेकर, संजयभाई काकडे आदींसह अधिकारी वर्ग व कामगारांनी अभिनंदन केले. यावेळी कामगार एक जुटीचा विजय असो अशा गगनभेदी घोषणा देण्यात आल्या. दरम्यान कामगार नेते अशोक भाई भोय यांच्या बेणसे येथील निवासस्थानी भेट घेऊन विजयी उमेदवारांनी अशोक भाई भोय यांना वाढदिवसाच्या व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत नवघर शाळेचे सुयश

रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी
मंगेश यादव

सन २०२३/२४ या शैक्षणिक वर्षात जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर प्रवेश परीक्षेत नवघर शाळेचा विद्यार्थी जीवक आनंद जाधव याने सुयश प्राप्त केले आहे. नवोदय विद्यालय निजामपूर येथे इयत्ता ६ वी च्या वर्गात प्रवेश घेण्यासाठी त्याची मेरिटच्या आधारे निवड झालेली आहे.जीवक ने हे यश प्राप्त केल्याबद्दल सर्वच स्तरातून त्याचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.ङ्ग नवोदय विद्यालयात निवड होऊन शाळेचा नावलौकिक वाढवल्या बद्दल शाळेचे मुख्याध्यापक अनिल राणे,शिक्षक वृंद व शाळा व्यवस्थापन समिती ने जीवक याचे अभिनंदन केले व त्याला पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.ङ्ग सुधागड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे यांनी जीवक याचे व त्याच्या कुटुंबाचे अभिनंदन केले व पुढील शिक्षणास शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद यांचेही अभिनंदन केले.



# रिलायन्सच्या क्रेडिट सोसायटीवर किशोर शिर्के व राजेंद्र लवटे विजयी

नागोठणे -: नारायण म्हात्रे

नागोठणे येथील रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीत कडसुरे गावचे सामाजिक कार्यकर्ते व सर्पमित्र किशोर शिर्के व पिगोंडे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच राजेंद्र लवटे यांचा दणदणीत विजय झाला आहे. हे दोन्ही सहकारी समाज कार्यामध्ये अग्रेसर असून त्यांच्या विजयाबद्दल सर्व सहका-यांनी अभिनंदन केले आहे.ङ्ग रिलायन्स हा आशिया खंडातील सर्वात मोठा प्रकल्प असून इथे झालेल्या सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीत अखंड पॅनल निवडून आले आहे. या सर्व विजयी उमेदवारांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# झाडे लावा झाडे जगवा सिद्धेश्वर येथे अनोखा उपक्रम

रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी/मंगेश यादव: राज्य शासनाने प्रदूषण रोखण्यासाठी तसेच शुद्ध हवामानासाठी झाडे लावण्यावर भर दिला असून त्याचाच आढावा घेऊन सिद्धेश्वर येथे माजी सरपंच योगेश सुरावकर, समाजसेवक गणेश दामले, संतोष यादव, सामाजिक कार्यकर्त्या सराव कर मॅडम, भिलारे गुरुजी, शाळेत विद्यार्थी यांनी झाडे लावून झाडे लावा झाडे जगवा हा उपक्रम पार पडला



